<u>स्वातंत्र्य सैनिकांना द्यावयाच्या वैद्यकीय सवलतीत वाढ</u>

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००८/प्र.क.१२२/स्वासैक-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक- २१ जानेवारी २०११.

**वाचा** - शासन निर्णय क्र.संकीर्ण २००८/प्र.क्र.१२२/२००८/स्वासैक-१ दिनांक २४ सप्टेंबर २००८.

**<u>प्रस्तावना:-</u>**

महाराष्टातील स्वातंत्र्य सैनिकांना प्रत्येक आर्थिक वर्षात रू.१००००/-च्या मर्यादेपर्यंत औषधोपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यास या विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण २००८/प्र.क्र.१२२/२००८/स्वासैक-१ दिनांक २४ सप्टेंबर २००८ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयानुसार जिल्हा शल्य चिकित्सकाने त्यांच्या विहित प्रमाणपत्रात हा खर्च प्रमाणित करणे आवश्यक आहे असे नमूद करण्यात आले आहे. या अटीमुळे स्वातंत्र्य सैनिकांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यामध्ये अडचणी येत असल्याने त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत विविध स्वातंत्र्य सैनिकांच्या संघटनांकडून शासनाकडे मागणी करण्यात येत होती. त्यामुळे सदर शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांना/स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांना प्रत्येक आर्थिक वर्षात रू.१००००/-च्या मर्यादेपर्यंत कोणत्याही आजारावरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय करण्यास आणि सदर वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता जिल्हा शल्य चिकित्सकाऐवजी जिल्हा ग्रामीण रूग्णालयाचे अक्षीक्षकाचे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(ज्ञा.ल.सुळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई/ मा.राज्यमंत्री (सा.प्र.वि.) यांचे खाजगी सचिव,
मा.सभापती/मा.सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मुंबई
महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई, ( २ प्रती) **(By R.P.A.D.)**
महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,( २ प्रती) **(By R.P.A.D**
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी ( सर्व )/ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,/सामान्य प्रशासन विभाग (स्वासैकक्ष-१), मंत्रालय, मुंबई,